महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.
(महाराष्ट्र शासन अंगीकृत)
CIN : U40109MH2005SGC153645
दुरध्वनी क्रमांक : ०२२ - २४०७७४४१
फॅक्स क्रमांक : ०२२ - २४०२५७६३

क्र. मासं/रवका/न.क्र.३४८/
एक्स्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत,
तळ मजला, प्लॉट नं.१, धारावी रोड, माटुंगा,
मुंबई ४०० - ०१९
email : cgmp@mahadiscom.in
website : www.mahadiscom.in

# प्रशासकीय परिपत्रक क्र. ६०९ दिनांक २९/०९/२०२०

**विषय :दैनंदिन प्रशासकीय कामकाजात मराठी भाषेचा वापर करणेबाबत.**

**संदर्भ :** १. प्रशासकीय परिपत्रक क्र. ३७० दि. १७.०८.२००२.
२. प्रशासकीय परिपत्रक क्र. ७४ दि. १८.०९.२००७.
३. प्रशासकीय परिपत्रक क्र. १०० दि. २१.०३.२००७.
४. प्रशासकीय परिपत्रक क्र. १७४ दि. १९.०९.२००८.
५. प्रशासकीय परिपत्रक क्र. २७३ दि. ०२.०१.२०१०.
६. प्रशासकीय परिपत्रक क्र. २८८ दि. १९.०४.२०१०.
७. प्रशासकीय परिपत्रक क्र. ३११ दि. ०९.०९.२०१०.
८. प्रशासकीय परिपत्रक क्र. ३२८ दि. २५.०१.२०११.
९. प्रशासकीय परिपत्रक क्र. ४१९ दि. ०७.०६.२०१२.
१०. प्रशासकीय परिपत्रक क्र. ४५३ दि. ०४.०१.२०१३.
११. प्रशासकीय परिपत्रक क्र. ४८१ दि. ०५.०४.२०१४.
१२. प्रशासकीय परिपत्रक क्र. ५६८ दि. ०४.०१.२०१८.
१३. क्र. मभावा- २०१९/प्र.क्र.२२/भाषा-२ दि. २९.०६.२०२०.
१४. क्र. औसवि/अ/१२८९२ दि. ३०.०७.२०२०

महाराष्ट्र शासनाचे दैनंदिन प्रशासकीय कामकाजात मराठी भाषेच्या वापराबाबतचे धोरण पूर्वीच्या म.रा.वि. मंडळ व मंडळाच्या त्रिभाजनानंतर महावितरण कंपनीमध्येही अंगीकृत करण्यात आलेले आहे. या अनुषंगाने अपरिहार्यता / वर्जित प्रयोजने वगळता मराठी भाषेचा दैनंदिन प्रशासकीय कामकाजात वापर करण्याबाबत उपरोक्त संदर्भीय प्रशासकीय परिपत्रका अन्वये वेळोवेळी सूचना / आदेश निर्गमित करण्यात आलेले आहेत. सदर आदेश / सूचना यामध्ये विविध प्रकारचा पत्रव्यवहार, परिपत्रके, अधिसूचना, संकेत स्थळे इत्यादी तसेच पत्र व्यवहारातील स्वाक्षरीकरीता मराठी भाषेचा वापर या बाबींचा समावेश आहे.

२. सद्यस्थितीत, विविध विभागांकडून निर्गमित करण्यात येणारी परिपत्रके/ अर्ज/ नमुने/ नोटीस/ पत्र इत्यादी व्यवहार इंग्रजीत होत असल्याची बाब शासनाच्या निदर्शनास आली असल्याने मराठी भाषेच्या वापराबाबत पुन:श्च सूचना देण्याच्या अनुषंगाने मराठी भाषा विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई, यांच्यामार्फत शासन परिपत्रक क्र. मभावा-२०१९/प्र.क्र.२२/भाषा-२ दि. २९.०६.२०२० निर्गमित करण्यात आले असून, **त्याव्दारे मराठी भाषेचा दैनंदिन प्रशासकीय कामकाजात प्राथम्याने वापर करण्याच्या अनुषंगाने सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत.**

३. प्रसृत शासन परिपत्रकान्वये असेही सूचित करण्यात आले आहे की, वर्जित प्रयोजने वगळता इतर बाबतीत संयुक्तीक कारण नसतांना राजभाषा मराठीचा वापर करण्यास टाळाटाळ करणाऱ्या अधिकारी व कर्मचारी यांच्या

Scanned by CamScanner

संदर्भात सामान्य प्रशासन विभागाच्या दि. १८ जुले १९८६ च्या शासन निर्णयानुसार अनुक्रमे लेखी ताकीद देणे, गोपनीय अहवालात नोंद घेणे, ठपका ठेवणे व एका वर्षाकरीता पुढील वेतनवाढ रोखणे इ. कारवाई करण्यात यावी. तसेच या सुचनांची अंमलबजावणी काटेकोरपणे करण्याच्या सूचना पुन:श्च देण्यात आलेल्या आहेत.

४. मुख्य कार्यालयाचे पत्र क्र. औसवि/अ/१२८९२ दि. ३०.०७.२०२० अन्वये यापुर्वीच क्षेत्रीय कार्यालयांना या बाबत सुचना देण्यात आलेल्या आहेत. सर्व संबंधीतांना निर्देशित करण्यात येते की मराठी भाषा विभाग महाराष्ट्र शासन यांच्या संदर्भिय परिपत्रकान्वये दिलेल्या सुचनांचे काटेकोरपणे पालन करावे.

५. सदर प्रशासकीय परिपत्रक कंपनीच्या e-library वर उपलब्ध करण्यात आलेले आहे.

सोबत : वरीलप्रमाणे.

(कमांडर शिवाजी इंदलकर)(से.नि.)
मुख्य महाव्यवस्थापक (मासं)

Scanned by CamScanner

**शासन व्यवहारात राजभाषा मराठीचा सक्षमपणे वापर करण्याबाबत.**

## महाराष्ट्र शासन
## मराठी भाषा विभाग
### शासन परिपत्रक क्रमांकः मभावा-२०१९/प्र.क्र.२२/भाषा-२

नवीन प्रशासन भवन, ८ वा मजला,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक: २९ जून २०२०

**वाचा :-**

१) सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्र. मभावा-१०७९/२८, दि. २२.०१.१९७९
२) सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक, क्र. मभावा-१०८०/प्र.क्र.५४/२०, दि.१८.०५.१९८२
३) सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक, क्र. मभावा-१०८५/प्र.क्र.९५/२०, दि.०४.०६.१९८५
४) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक मभावा /४३२/१०८६-प्र.क्र.१६१/८६/वीस-ब, दि.१८.०७.१९८६
५) सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक, क्र. मभावा-२०१०/प्र.क्र.७५/वीस-ब, दि.१४.०७.२०१०
६) मराठी भाषा विभाग, शासन परिपत्रक क्र. मभावा-१०११/प्र.क्र.७८/२०११/भाषा-२, दि.१०.०५.२०१२ .
७) मराठी भाषा विभाग, शासन परिपत्रक क्र. मभावा-१०१३/५७/८२/प्र.क्र.९/२०१३/भाषा-२, दि.२९.०१.२०१३
८) मराठी भाषा विभाग, शासन निर्णय क्र.मभावा-२०१५/प्र.क्र.३६/भाषा-२, दि.२८.०४.२०१५
९) मराठी भाषा विभाग, परिपत्रक क्रमांक-मभावा-२०१८/प्र.क्र.४७/भाषा-२, दि.०७.०५.२०१८

**प्रस्तावना :-**

प्रशासकीय कामकाजात मराठी भाषेचा वापर करण्याबाबत उपरोक्त संदर्भाधिन शासन निर्णय व परिपत्रकांन्वये वेळोवेळी सूचना दिलेल्या आहेत. तसेच, मराठी भाषेच्या वापरामध्ये येणाऱ्या अडचणींसंदर्भात उपाययोजनादेखील सूचविलेल्या आहेत. तरीसुध्दा, शासकीय कार्यालयांतून व प्रशासकीय विभागातून काटेकोरपणे १०० % मराठी भाषेचा वापर केला जात नसल्याच्या बाबी निदर्शनास येत आहेत. काही मंत्रालयीन विभागांचे शासन निर्णय इंग्रजी भाषेत असल्याचे दिसून येते. महानगरपालिकांकडून मराठी भाषेचा सक्षमपणे वापर होत नसल्याबाबत तसेच नैसर्गिक आपत्तींची माहिती देताना व त्या संदर्भात नागरीकांना सूचना देताना मराठी भाषेचा वापर अधिकाऱ्यांमार्फत केला जात नसल्याच्या तक्रारी विभागाकडे “आपले सरकार” प्रणालीमार्फत तसेच अन्य विविध माध्यमातुन

वारंवार प्राप्त होत आहेत. या सर्व तक्रारींच्या अनुषंगाने राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत, "शासकीय कामकाजात मराठी भाषेचा वापर करण्यासंदर्भात शासनस्तरावरुन वेळोवेळी दिलेल्या सूचना सर्व विभागांना पुनःश्च देण्याबाबत व या सूचनांचे पालन न करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांविरुध्द शिस्तभंगविषयक कारवाई करण्याच्या सूचना देण्याबाबत" निदेश दिले आहेत. त्यानुषंगाने सदर तरतुदी पुन्हा सर्व विभागांच्या निदर्शनास आणण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

## शासन परिपत्रक :-

महाराष्ट्र राजभाषा अधिनियम, १९६४ आणि त्या अंतर्गत महाराष्ट्र राजभाषा (सुधारणा) अधिनियम, २०१५ व महाराष्ट्र राजभाषा (वर्जित प्रयोजने) नियम १९६६, दि. ३० एप्रिल १९६६ नुसार मंत्रालयीन विभाग व त्यांच्या नियंत्रणाखालील विभागीय कार्यालये व राज्यशासनाची सर्व कार्यालये यांनी "वर्जित प्रयोजने" वगळता सर्वसामान्य जनतेशी करण्यात येणारा सर्व पत्रव्यवहार व इतर कार्यालयीन कामकाज पुर्णपणे मराठी भाषेतून करणे अनिवार्य आहे. याबाबत संदर्भाधिन शासन निर्णय व परिपत्रकांनी वेळोवेळी सूचना दिलेल्या आहेत. त्यानुषंगाने प्रशासकीय कामकाजात मराठी भाषेचा वापर करण्याबाबतच्या शासनाच्या धोरणाची अंमलबजावणी राज्य शासनांतर्गत सर्व विभागांनी व कार्यालयांनी स्वयंप्रेरणेने करणे आवश्यक आहे. त्यासाठी प्रत्येक विभागाने आपापल्या विभागाच्या कामकाजाच्या संबंधातील नियम करताना मराठी भाषा वापराच्यासंदर्भात उल्लेख करणे आवश्यक आहे.

२. उपरोक्त संदर्भ क्र. ९ येथील दि. ०७.०५.२०१८ च्या परिपत्रकान्वये प्रशासकीय कामकाजात मराठी भाषेचा वापर १०० टक्के करण्याच्या दृष्टीने सर्वसमावेशक सविस्तर सूचना दिलेल्या आहेत. तरीसुध्दा अजूनही काही विभागांचे शासन निर्णय, संकेतस्थळे, पत्रव्यवहार, पत्रावरील आद्याक्षरे इ. इंग्रजीमध्ये दिसून येतात. त्यामुळे आपल्या कार्यालयातील तसेच आपल्या नियंत्रणाखालील सर्व कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी यांच्याकडून मराठी भाषेचा वापर करण्यासंदर्भात दि. ०७.०५.२०१८ च्या परिपत्रकातील सूचनांची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्याबाबत कटाक्षाने लक्ष देऊन आवश्यक ती उपाययोजना करण्यासाठी सर्व विभागप्रमुख व कार्यालयप्रमुख यांना पुन्हा सूचना देण्यात येत आहेत. तसेच, सदर सूचना आपल्या विभागाच्या नियंत्रणाखालील सर्व कार्यालयांनादेखील देण्यात याव्यात. नैसर्गिक आपत्तींसंदर्भातील उपाययोजनांसंदर्भात तसेच इतर सर्व क्षेत्रातील माहितीसंदर्भात नागरीकांना द्यावयाच्या सूचना मराठी भाषेत दिल्यास स्थानिक लोकांना माहिती नीट समजेल व त्यांच्याकडून योग्य प्रकारे सूचनांचे पालन केले जाईल.

३. मंत्रालयीन स्तरावरील काही विभागांमार्फत टिप्पण्या, शासन निर्णय/ परिपत्रके इंग्रजी भाषेत तयार करण्यात येतात. ही बाब संबंधित विभागांच्या यापुर्वी निदर्शनास आणली आहे. तसेच काही विभागांची व त्या अंतर्गत कार्यालयांची संकेतस्थळे केवळ इंग्रजीत असल्याचेही निदर्शनास आले आहे. बऱ्याच महानगरपालिकांकडून अर्ज/नमुने/नोटीस/पत्र इत्यादी व्यवहार अद्यापही इंग्रजीत होत असल्याबाबतची बाब लोकप्रतिनिधींनी सभागृहात निदर्शनास आणली आहे. त्यामुळे सर्व महानगरपालीका/नगरपरिषदा यांनी वारंवार लागणारे प्रमाणअर्ज / नोटीशीचे नमुने, दंडात्मक पावत्या यांचा अनुवाद भाषा संचालनालयाकडून मराठी भाषेत करून घेऊन त्याचा प्राथम्याने वापर करावा.

यासाठीच्या कडक सूचना नगर विकास विभागाने संबंधितांना द्याव्यात. बऱ्याच विभागांकडून केंद्रशासित योजनांच्या मार्गदर्शक सूचना, जाहिराती व घोषवाक्ये इत्यादी या केंद्रशासनाकडून दिलेल्या नमून्यात इंग्रजी किंवा हिंदी भाषेत जशाच्या तशा छापण्यात येतात. विशेषत: आरोग्य, शिक्षण, कृषि, स्वच्छता, ग्रामविकास व निवडणुक इत्यादीबाबतच्या योजनांसंदर्भातील माहिती लोकांपर्यंत पोहोचविण्याकरीता ती स्थानिक भाषेतून म्हणजे मराठीतून देण्याबाबत संबंधित विभागांनी कटाक्षाने काळजी घ्यावी. तसेच केंद्रशासनाकडून किंवा अन्य कोणत्याही मार्गाने इतर भाषेत प्राप्त होणाऱ्या योजनांच्या माहितीबाबतचे दस्तावेज संबंधित विभागाने मराठी भाषेत अनुवादीत करावेत व सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवावेत, जेणेकरुन स्थानिक लोकांना शासनाच्या योजनांचा लाभ घेता येईल.

४. वर्जित प्रयोजने वगळता इतर बाबतीत संयुक्तीक कारण नसताना राजभाषा मराठीचा वापर करण्यास टाळाटाळ करणाऱ्या अधिकारी व कर्मचारी यांच्यासंदर्भात सामान्य प्रशासन विभागाच्या दि. १८ जुलै, १९८६ च्या शासन निर्णयान्वये अनुक्रमे लेखी ताकीद देणे, गोपनीय अहवालात नोंद घेणे, ठपका ठेवणे व एका वर्षाकरीता पुढील वेतनवाढ रोखणे इ. कारवाई करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. या सूचनांची अंमलबजावणी काटेकोरपणे करण्याच्या सूचना पुन्हा एकदा सर्व कार्यालय व विभागप्रमुखांना देण्यात येत आहेत.

सदर परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेताक २०२००६२९१२०१४८७८३३ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Rajashri Uday Bapat

Digitally signed by Rajashri Uday Bapat
DN: CN = Rajashri Uday Bapat, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Marathi Language Department
Date: 2020.06.29 13:17:16 +05'30'

**( राजश्री बापट )**
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मा. राज्यपाल यांचे सचिव
२) मा. मुख्यमंत्री यांचे सचिव
३) मा. मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
४) मा.मंत्री, मराठी भाषा यांचे स्वीय सहायक
५) मा. विरोधी पक्ष नेते, विधानसभा/विधानपरिषद यांचे खाजगी सचिव
६) सर्व सदस्य, महाराष्ट्र विधानमंडळ (विधानपरिषद/विधानसभा), मुंबई
७) समिती प्रमुख, मराठी भाषा समिती, महाराष्ट्र विधानमंडळ , विधानभवन, मुंबई

८) मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई
९) अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग
१०) सर्व विभागीय आयुक्त
११) सर्व जिल्हाधिकारी
१२) सर्व मंत्रालयीन विभाग, यांना विनंती करण्यात येते की, त्यांनी सदर परिपत्रक त्यांच्या अधिपत्याखालील सर्व विभागप्रमुख व कार्यालयप्रमुख, न्यायाधिकरणे, प्राधिकरणे, महामंडळे यांच्या निदर्शनास आणावे.
१३) निवासी आयुक्त, महाराष्ट्र सदन, कोपर्निकस मार्ग, नवी दिल्ली
१४) प्रबंधक, उच्च न्यायालय, मूळ शाखा, मुंबई (पत्राने)
१५) प्रबंधक, उच्च न्यायालय, अपिल शाखा, मुंबई (पत्राने)
१६) प्रबंधक, लोकायुक्त/उप लोकायुक्त, मुंबई (पत्राने)
१७) प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई (पत्राने)
१८) सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई (पत्राने)
१९) सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय (विधानसभा/विधानपरिषद), मुंबई (पत्राने)
२०) राज्य निवडणूक आयुक्त, राज्य निवडणूक आयोग, नवीन प्रशासकीय भवन, मुंबई (पत्राने)
२१) सचिव, राज्य माहिती आयोग, नवीन प्रशासकीय भवन, मुंबई (पत्राने)
२२) महालेखापाल (लेखा परीक्षा/लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१, मुंबई
२३) महालेखापाल (लेखा परीक्षा/लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-२, नागपूर
२४) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
२५) निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
२६) महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मुंबई
२७) भाषा संचालक, भाषा संचालनालय, वांद्रे (पूर्व), मुंबई
२८) सचिव, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, मुंबई
२९) सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई
३०) संचालक, राज्य मराठी विकास संस्था, मुंबई
३१) निवडनस्ती भाषा-२